पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

दिनांक - **०७/१०/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०७/१०/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सौ.स्वाती प्रमोद साने - सभापती**
२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
३. मा.जाधव साधना रामदास
४. मा.पालांडे सुजाता सुनिल
५. मा.चौंधे आरती सुरेश

या शिवाय मा.दंडवते - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.रत्नपारखी – कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१९) आरक्षणाखालील क्षेत्र रहिवाशी विभागात समाविष्ट करणेबाबत – मा.सुजाता पलांडे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२०) मौजे चिखली येथील गट नंबर ११९५ ते गट नं.१२०७ मधील ३०.०० मी. रस्त्याचे आखणीत फेरबदल करणेबाबत – मा.सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२१) मौजे मोशी येथील जुना गट नंबर ४५० मधील आ.क्र.१/२०२ ट्रक टर्मिनस म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत – मा.सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

----------

**अ**) दिनांक ०३/०६/२०१५, ०९/०६/२०१५, १७/०६/२०१५, ०१/०७/२०१५ व १५/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २०)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**आ**) दिनांक १७/०६/२०१५, ०१/०७/२०१५, १५/०७/२०१५, २४/०७/२०१५, २९/०७/२०१५ व ३१/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २१)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**इ**) दिनांक १५/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २२)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**ई**) दिनांक १४/०९/२०१५ रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ०४ विषय क्रमांक – ०१
दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.साधना जाधव
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै.मधील २४ व १२ मी. रुंद (पूर्व-पश्चिम) रस्त्याचे भूसंपादनाबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०५ विषय क्रमांक – ०२
दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.आरती चौंधे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/१५/२०१५, दि.०१/०६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

भूसंपादन, पुणे सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाचे मुल्यमापन करण्यासाठी विविध शाखेतील तज्ञ गट स्थापन करणेबाबत –

संदर्भ १) मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण ०१/२०१५/प्र.क्र.२/अ-२, दि. २३/०१/२०१५ व २) मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे पत्र क्र.पीएलसी/कावि/८०/२०१५,दि.१०/०२/१५

अन्वये उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.१ नुसार नवीन भूसंपादन नियमावलीतील “ नियम ७ (ख)” नुसार राज्य शासन सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाचे मुल्यमापन करण्याकरिता विविध शाखेतील तज्ञगटाची नेमणूक करणा-या तज्ञ गटामध्ये ज्यांना सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रियेमध्ये प्रतिनिधीत्व देण्यात आलेले नसेल अशा ग्रामसभेच्या, पंचायतीच्या, नगरपरिषदेच्या अथवा महानगरपालिकेच्या सदस्यांमधून दोन प्रतिनिधी या पैकी किमान एक महिला प्रतिनिधी असेल अशी २ नावे शासनास तात्काळ सादर करण्यात यावीत जेणेकरून शासनस्तरावर त्यांचे पॅनल तयार करता येईल असे मा.उप सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी मा.विभागीय आयुक्त व मा.जिल्हाधिकारी यांना कळविले आहे. सदरचे पत्रास अनुसरुन संदर्भ क्र.२ अन्वये “ उक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या सुचनेप्रमाणे नियम ७(ख) नुसार दोन व्यक्तींची नावे तात्काळ या कार्यालयास कळवावीत म्हणजे सदरचा अहवाल मे.शासनास सादर करता येईल.” असे मा.जिल्हाधिकारी पुणे यांनी मनपाला कळविले आहे. नवीन भूसंपादन नियमावलीतील नियम ७(ख) नुसार १) मा.अजित दामोदर गव्हाणे, व २) मा.वैशाली जालिंदर काळभोर या दोन व्यक्तींची नावे मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास कळविण्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०६ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु

सुचक – मा.आरती चौंधे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/३/कावि/३००/१५/२०१५, दि.२३/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र शासनाने दि. २ मे २०१४ रोजी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्वविकास) (सुधारणा) अधिनियम २०१४ पारित केला आहे. सदर अधिनियमाव्दारे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुर्नविकास) अधिनियम १९७१ मध्ये दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. उपरोक्त अधिनियमातील दुरुस्तीस अनुसरुन गृहनिर्माण विभागामार्फत क्रमांक झोपुधो - १००१/प्र.क.१२५/१४/ झोपसु-१ दि.१६ मे, २०१५ अन्वये शासन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. सदर दुरुस्त्या व दि. ११ जुलै, २००१ दि. ८ नोव्हेंबर, २००१, दि. २ जानेवारी, २०१२ आणि दि.२२ जुलै, २०१४ च्या आदेशातील तरतूदींचे अधिक्रमण करुन सुधारीत कागदपत्रे /अभिलेख व कार्यपध्दती विहित करणेचा निर्णय घेणेत आला आहे.

<u>शासन निर्णयातील ठळक बाबी खालीलप्रमाणे</u>-

**१) झोपडी व झोपडीवासिय संरक्षणपात्र ठरविण्याबाबत.**

**(अ)** झोपडी दि.१/१/२००० अथवा त्यापूर्वीची संरक्षणप्राप्त झोपडी आहे त्यासाठी विवरणपत्रातील किमान एक अनिवार्य पुरावा आवश्यक आहे.

**(ब)** सध्या तिथे राहत असल्यास पत्याचा उल्लेख असलेल्या विवरणपत्रातील अलिकडच्या एक वर्षातील किमान एक अनिवार्य पुरावा आवश्यक आहे.

**(क)** झोपडी दि.१/१/२००० नंतरच्या दिनांकापासून सध्या राहत असलेल्या विवरणपत्रातील अलिकडच्या एक वर्षातील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावा आवश्यक आहे.

**२) शपथपत्राबाबत –**

**अ)** झोपडीधारक त्याच्या/तिच्या, पत्निच्या/पतीच्या अथवा १८ वर्षाखालील (अज्ञान) मुलांच्या नांवे महानगरपालिका क्षेत्रात अन्य झोपडी/घर/सदनिका मालकी तत्वावर अथवा भाडे तत्वावर नसल्याचे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ०९ मार्च २०१५ अन्वये स्वत:चा फोटो लावुन "स्वयंघोषणापत्र"(Self-Declaration)साध्या कागदवर भरुन देणे आवश्यक राहील.

**ब)**झोपडीधारक जोडपत्र तिन किंवा जोडपत्र चार भरुन देताना त्यासोबत स्वयं साक्षांकन जोडलेल्या पुराव्यावर "स्वंय स्वाक्षांकनासाठीचे स्वयंघोषणापत्र"(SelfDeclaration for Self Attestation)देणे आवश्यक असेल.

**क)**नमुने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०९ मार्च २०१५ सोबतच्या प्रपत्र "अ"व "ब"प्रमाणे राहतील.

**३) अ) दि. १/१/२००० पूर्वीपासूनच्या झोपडीवासियांसाठी अर्जाबाबत**

नमुन्यात दर्शविलेल्या अर्जासोबत "जोडपत्र तीन" (जोडपत्र-पाचसह) अर्ज भरणे आवश्यक राहील.

**ब) दि. १/१/२००० नंतरच्या झोपडीवासियांसाठी अर्जाबाबत**

नमुन्यात दर्शविलेल्या अर्जासोबत "जोडपत्र चार"(जोडपत्र-पाचसह) अर्ज भरणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग यांचेकडील २ जानेवारी २०१२ नुसार अपात्र ठरला असेल तर त्यांनाही पुन्हा अर्ज करता येईल.

वरिल पुर्ततेनुसार, संगणकावर संकलित केलेले माहिती व फोटोच्या आधारे पडताळणी, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अमलंबजावणीसाठी निष्कासित झालेल्या झोपडीच्या पुराव्या आधारे, स्थळ पाहणी, करुन पात्र/अपात्र बाबत निर्णय घेणे. व अभिलेखाचे जतन करणे. पुनर्वसनाचा लाभ देतात त्याच्या/तिच्या, पत्निची/पतीची फोटोसह माहिती व त्या दोघांच्या आधारकार्डाच्या क्रमांकाची नोंद करुन संलग्न करणे.

तरी उपरोक्त दि. २ मे २०१४ रोजीचा महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्वविकास) (सुधारणा) अधिनियम २०१४ व त्याअनुषंगाने दि. ११ जुलै, २००१ दि. ८ नोव्हेंबर, २००१, दि. २ जानेवारी, २०१२ आणि दि.२२ जुलै, २०१४ च्या आदेशातील तरतूदींचे अधिक्रमण करुन सुधारीत दि. १६ मे, २०१५ चा शासन निर्णय मा. महापालिका सभेपुढे अवलोकनार्थ ठेवणेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०७ विषय क्रमांक – ०४
दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.साधना जाधव अनुमोदक – मा.अमिना पानसरे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१६/७०६/२०१५, दि.०१/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे -

मौजे मोशी येथील शिवाजीवाडी मधील गट नं.४८ जूना (गट नं.४९) मधील ६०.०० मी. पुणे नाशिक महामार्गापासून गट नं.१५१ (जूना गट नं.१५१) मधील देहू आळंदी ३०.०० मी. रस्त्यापर्यंतचा रस्ता विकसित करणेसाठी जमीन संपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर रस्ता रुंदीकरणाखालील जमीन खाजगी मालकीची असल्याने रस्तारुंदीने बाधीत होणा-या क्षेत्राचे भूसंपादन करणे आवश्यक असल्याने रस्तारुदींने बाधीत जमीनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (२) व भूसंपादन कायदा १८९४ चे तरतूदी अंतर्गत भूसंपादन करावे लागेल. सदर भूसंपादन प्रस्तावास मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०८ विषय क्रमांक – ०५
दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.आरती चौंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३०६/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.३७ लांडेवाडी झोपडपट्टीतील संडास ब्लॉक नं.२ (१० सिट्स) पाडून २६ सिट्सचे शौचालय बांधणेकामी येणा-या र.रु.३५,००,०००/- ( अक्षरी र.रु. पस्तीस लाख फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०९ विषय क्रमांक – ०६
दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.आरती चौंधे अनुमोदक – मा.अमिना पानसरे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३०५/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.६४ येथील सिध्दार्थनगर येथील ब्लॉक नं.५ (२० सिट्स) चे शौचालय पाडून २६ सिट्सचे शौचालय बांधणेकामी येणा-या र.रु.३५,००,०००/-(अक्षरी र.रु. पस्तीस लाख फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक – ०७
दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.साधना जाधव
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३०७/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.६४ येथील गुलाबनगर येथील ब्लॉक नं.३ येथील (१२ सिट्स) चे शौचालय पाडून २६ सिट्सचे शौचालय बांधणेकामी येणा-या र.रु.३५,००,०००/- ( अक्षरी र.रु. पस्तीस लाख फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक – ०८
दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.आरती चौंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३०८/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.२५ आनंदनगर झोपडपट्टीत कच्चे रस्ते करणेकामी येणा-या र.रु.३५,००,०००/- ( अक्षरी र.रु. पस्तीस लाख फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक – ०९
दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.साधना जाधव अनुमोदक – मा.आरती चौंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३०९/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.२७ मोरवाडी झोपडपट्टीत कच्चे रस्ते करणेकामी येणा-या र.रु.२५,००,०००/- ( अक्षरी र.रु. पंचवीस लाख फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक – १०
दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अमिना पानसरे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३१०/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.८ दत्तनगर झोपडपट्टी मध्ये जुने VDO Centre येथे जुने संडासब्लॉक पाडून २६ सिट्सचे शौचालय बांधणेकामी येणा-या र.रु.३५,००,०००/-(अक्षरी र.रु. पस्तीस लाख फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.साधना जाधव

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३११/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.४२ भाटनगर झोपडपट्टीमध्ये बौध्दनगर येथील महिलांसाठीचे ४ सिट्सचे जुने शौचालय पाडून ८ सिट्सचे दुमजली शौचालय बांधणेकामी येणा-या र.रु.२४,६८,०००/- ( अक्षरी र.रु. चोवीस लाख अडूसष्ट हजार फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक – १२

दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.आरती चौंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३१२/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.४२ भाटनगर झोपडपट्टीमध्ये आंबेडकरनगर येथील महिलांसाठीचे ४ सिट्सचे जुने शौचालय पाडून ८ सिट्सचे दुमजली शौचालय बांधणेकामी येणा-या र.रु.२४,९४,०००/- (अक्षरी र.रु. चोवीस लाख चौ-याण्णव हजार फक्त) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.आरती चौंधे अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३१३/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.४२ भाटनगर झोपडपट्टीमध्ये आंबेडकरनगर येथील पुरुषांसाठीचे ४ सिट्सचे जुने शौचालय पाडून ८ सिट्सचे दुमजली शौचालय बांधणेकामी येणा-या र.रु.२४,७६,०००/- (अक्षरी र.रु. चोवीस लाख शहात्तर हजार फक्त) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १७ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.आरती चौंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३१४/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे –

मिलिंदनगर येथे समाजमंदिर बांधणेकामी येणा-या र.रु.५०,००,०००/- ( अक्षरी र.रु. पन्नास लाख फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक – १५

दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.आरती चौंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३१५/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे –

मिलिंदनगर, सुभाषनगर, आदर्शनगर येथील रस्ते डांबरीकरण करणेकामी येणा-या र.रु.२५,००,०००/- ( अक्षरी र.रु. पंचवीस लाख फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक – १६

दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.साधना जाधव

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३१६/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्र.४२ मधील आंबेडकरनगर, बौध्दनगर, रमाबाईनगर झोपडपट्टीमध्ये आवश्यक त्या ठिकाणी पावसाठी पाण्याची लाईन टाकणे व काँक्रीट पेव्हिंग करणे आणि पेव्हर ब्लॉक बसविणेकामी येणा-या र.रु.१७,५०,०००/- ( अक्षरी र.रु. सतरा लाख पन्नास हजार फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक – १७

दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.साधना जाधव

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३१७/२०१५, दि.२४/०९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्र.४२ मधील झोपडपट्टीमध्ये रमाबाईनगर व आंबेडकरनगर येथील नाल्याच्या भिंतीची उंची वाढविणे व संरक्षक भिंत तयार करणेकामी येणा-या र.रु.२५,००,०००/- ( अक्षरी र.रु. पंचवीस लाख फक्त ) चे पुर्वगणणपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०७/१०/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.आरती चौंधे अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/टे-८/६८८६/२०१५, दि.०१/१०/२०१५

विषय - मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.७९ पैकी व ८० पैकी जागेत आरक्षण क्र.३५६, " प्राथमिक शाळा विस्तार " चे जमिनीचे भूसंपादन करणेबाबत ...

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०७/१०/२०१५

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे दिघी मंजूर विकास योजना आराखडयात स.नं.७८ पै मध्ये २/११६ प्राथमिक शाळा हे आरक्षण असून सदर आरक्षणाखालील क्षेत्रामध्ये आरक्षण मंजूर होण्याअगोदर पासून घरे आहेत. तसेच आजूबाजूला ७ ते ८ शाळा आहेत. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील स.नं.७८ मधील आरक्षण क्र.२/११६ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील शाळेचे आरक्षण क्र.२/११६ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणाखालील क्षेत्र रहिवाशी विभागात समाविष्ठ करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक – २०

दिनांक – ०७/१०/२०१५

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव –

मौजे चिखली येथील गट नंबर ११९५ ते ग.नं.१२०७ पर्यंत मंजूर विकास आरखडयातील ३०.०० मी. रस्त्याची म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार आखणी निश्चित करणेत आलेली होती. परंतु म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३० नुसार त्यात काही बदल दर्शविलेला आहे. त्यात केलेल्या बदलास शासनाची मान्यता मिळालेली आहे. तरी फेरबदल केलेल्या आखणीमुळे त्यातील बाधीत मिळकतधारकांवर अन्याय झालेला आहे. त्यामुळे म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार प्रसिध्द केलेल्या आखणीनुसार रस्त्याची आखणी कायम करणेकरीता म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदलाची कार्यवाही करणेत यावी. प्रस्तावित या रस्त्याचे आखणीस म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक – २१

दिनांक – ०७/१०/२०१५

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव –

मौजे मोशी येथील गट नं.४५० मंजूर विकास आराखडयात ९० मी. रस्त्यालगत १०० मी. अंतरावर दक्षिण बाजूचे अस्तित्वातील रस्त्याला ४५ मी. रस्तारूंदी (भोसरी हद्दीलगत) दर्शविणेत आलेली आहे. दोन्ही रस्ते लगत असल्यामुळे विकसित करणेस अडचणी व नियोजन करता येणार नाही. सद्यस्थितीत गट नं.४५० मध्ये मोठया प्रमाणात लोकवस्ती आहे. नागरिकांनी आपली घरे महापालिकेचा विकास आराखडा मंजूर होण्यापूर्वी बांधलेली आहेत. त्यामुळे सर्व नागरिकांवर अन्याय होणार आहे. तसेच सदर ९०.०० मी. रस्त्यामुळे सर्व रहिवाशी बेघर होणार आहेत. नवनगर विकास प्राधिकरण हद्दीत रस्त्याची रुंदी ७५.०० मी. आहे. नवनगर विकास प्राधिकरण हद्दीतून येणारा ७५.०० मी. रस्ता व मोशी हद्दीतील ९०.०० मी. रस्ता हे देखील समोरासमोर येत नाहीत. तसेच ते नियोजनाच्या दृष्टीकोनातून देखील योग्य होणार नाही. त्यामुळे मंजूर विकास आराखडयातील ९०.०० मी. रस्ता रद्द करुन भोसरी-मोशी हद्दीवर ४५.०० मी. रस्त्याचे उत्तर बाजूस मोशी हद्दीत ७५.०० मी. रस्ता प्रस्तावित करणे नियोजनाच्या दृष्टीने योग्य होईल. प्रस्तावित करावयाच्या ७५.०० मी. रस्त्याची रुंदी नाशिक महामार्ग रस्त्यापासून लोहगाव हद्दीपर्यंत ७५.०० मी. रस्त्याची रुंदी निश्चित करावी. तरी प्रस्तावित करावयाच्या रस्त्याची आखणी व आरक्षणास म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. प्रस्तावित या रस्त्याचे

आखणीस म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सौ.स्वाती प्रमोद साने )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७१६/२०१५
दिनांक : ०७/१०/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2015 sub committee sabhapati.doc